सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/१६०                                                        दिनांक : ०६/०८/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : सांस्कृतिक कार्यशाळेच्या प्रत्यक्ष सहभागाबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळातंर्गत विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रमाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येते. आपला संघ तयार होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन/प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये सांस्कृतिक कार्यशाळेचे खालीलप्रमाणे प्रत्यक्ष आयोजन करण्यात करण्यात आले आहे.

१. सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयाने आपले विद्यार्थी व सांस्कृतिक समन्वयक स्वखर्चाने पाठवावेत.
२. कार्यशाळेमध्ये सहभागी होण्याकरिता महाविद्यालयाने याबाबत ऑनलाइन नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.
३. आपल्या महाविद्यालयाच्या संघांचे नेतृत्व सांस्कृतिक समन्वयक/विद्यार्थी कल्याण अधिकारी/ प्राध्यापक यांनीच करावे. फक्त विद्यार्थ्यांना सहभागासाठी पाठवू नये.
४. सदर कार्यशाळेसाठी आयत्यावेळची नावनोंदणी मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या स्वतंत्र्य परवानगीशिवाय घेतली जाणार नाही.
५. सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाचा संघ हा एकूण ०३ व्यक्तींपेक्षा जास्त नसावा.

सदर सांस्कृतिक कार्यशाळेचे प्रत्यक्ष आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| अ. क्र. | वार व दिनांक | जिल्हा/विभाग | प्रत्यक्ष नावनोंदणी वेळ | आयोजन ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२६ | पुणे शहर व पुणे ग्रामीण सर्व महाविद्यालये | सकाळी ०९.०० वाजता | स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह, विद्यापीठ परिसर, पुणे |
| ०२ | गुरूवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०२६ | नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालये | सकाळी ०९.०० वाजता | मराठा विद्या प्रसारक समाजाचे, इन्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲड टेक्नॉलॉजी, मॅरेथॉन चौक, गंगापूर रोड, नाशिक |
| ०३ | शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ | अहिल्यानगर जिल्हयातील सर्व महाविद्यालये | सकाळी ०९.०० वाजता | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अहिल्यानगर उपकेंद्र, अहिल्यानगर |

आपल्या महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयक आणि कलाकार एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी यांना सदर सांस्कृतिक कार्यशाळेत विहित वेळेत उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

संपर्क क्र. : ०२०२५६२२६८०

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ